# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ / फाल्गुन २६, १९४७ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**<br>**(२) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री**<br>**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**<br>**(४) शालेय शिक्षण मंत्री**<br>**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**<br>**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**<br>**(७) वस्त्रोद्योग मंत्री**<br>**(८) सहकार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २३**

---

### जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्ज वसुलीस स्थगिती दिल्याबाबत

**(१) * ७७१६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आतापर्यंत १,०८० कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले असून अतिवृष्टीमुळे शासनाने सदर कर्ज वसुलीस एक वर्षाची स्थगिती दिली असल्याने नवीन कर्ज वाटपाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब दिनांक ५ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्ज वसुली न झाल्याने बँकेकडे पुरेसा निधी उपलब्ध राहणार नसून, पुनर्गठनामुळे शासनाकडून शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभही मिळणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा बँकेला विशेष निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस सन २०२५-२६ मध्ये खरीप व रब्बी हंगामासाठी कर्जवाटपाचे उद्दिष्ट अनुक्रमे रुपये १०८०.८६ कोटी व रुपये ३२३ कोटी असे एकूण रुपये १४०३.८६ कोटी इतके देण्यात आले आहे. त्यानुसार बँकेने खरीप हंगामाकरीता रुपये १०८५.०२ कोटी व रब्बी

हंगामाकरीता दिनांक ०९/०२/२०२६ पर्यंत रुपये ६७ लाख असे एकूण रुपये १०८५.६९ कोटी पीक कर्ज वाटप केले आहे.

शासन निर्णय दिनांक १०/१०/२०२५ व शासन परिपत्रक दिनांक २६/११/२०२५ अन्वये शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस एक वर्षासाठी स्थगिती देण्यात आली असून बिगरशेती तथा वैयक्तीक स्वरुपाच्या कर्जास स्थगिती देण्यात आली नाही. त्यामुळे नवीन कर्ज वाटपाचा प्रश्न गंभीर झाला आहे असे दिसून आले नाही.

(२) अंशत: खरे आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमधील पीक कर्जाच्या वसुलीचा अंतिम दिनांक ३० जून असून मध्यम मुदत शेती कर्ज तसेच बिगरशेती व व्यक्तीगत कर्जाच्या वसुलीचा कालावधी वेगवेगळा आहे. सन २०२५-२६ मध्ये जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील दिनांक ३०/०९/२०२५ अखेर वसुलीस पात्र चालु कर्जाची रक्कम रुपये १०७३.६४ कोटी व थकीत कर्जाची रक्कम रुपये ८१६.३८ कोटी याप्रमाणे एकूण वसुलपात्र रक्कम रुपये १८९०.०२ कोटी आहे. बँकेकडे जानेवारी, २०२६ अखेर रुपये ४.६७ कोटी रकमेची वसुली झाली असून अद्याप वसुलीचा कालावधी बाकी आहे.

शासनाच्या धोरणाप्रमाणे बँकेकडे सहकारी कर्जाचे पुनर्गठन झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा शासकीय अर्थसहाय्य मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही. तथापि, बँकेने नाबार्डकडील अतिरिक्त फेर कर्ज रुपये ८०० कोटी मिळण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे सादर केला असून बँकेने सदर प्रस्ताव दिनांक २५/०२/२०२६ रोजी मंजूर केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेगांव (जि.बुलढाणा) येथील जिगांव धरणाच्या देखभाल-दुरुस्ती व रस्ता बांधकामाच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(२) * ७२२० श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगांव (जि.बुलढाणा) येथील जिगांव धरणाच्या बांधकामाशी संबंधित देखभाल-दुरुस्ती व रस्ता बांधकामाच्या निविदा प्रक्रियेत निलेश इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने बनावट कागदपत्रे व प्रमाणपत्रे सादर करुन सदर प्रमाणपत्रांच्या आधारे सुमारे १५.६३ कोटी रुपये किंमतीचे कंत्राट मिळविल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने बनावट कागदपत्रे सादर करुन सुमारे १५.६३ कोटी रुपये किंमतीचे कंत्राट मिळविणाऱ्या संबंधित दोषी कंत्राटदार व यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) "जिगांव प्रकल्पा अंतर्गत जिगांव धरणाच्या खालील बाजूस देखभाल दुरुस्तीकरिता रस्ता बांधकाम करणे." या कामाकरीता ऑनलाईन निविदा सूचना दिनांक ०९/०८/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदा प्रक्रीयेदरम्यान कंत्राटदाराने निविदा अटी व शर्ती नुसार आवश्यक दस्तऐवज ऑनलाईन सादर केले होते. त्यानुसार निविदा प्रक्रीया पूर्ण करुन दिनांक २३/११/२०२३ रोजी मे.निलेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,नंदुरबार यांना कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आला होता. सदर कामाच्या निविदा अटी व शर्ती तसेच विर्निदिष्ठानुसार क्षेत्रिय स्थळी दिनांक २८/०८/२०२५ रोजी काम पूर्ण झाले आहे.

सदर काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक १०/११/२०२५ रोजी तक्रार क्षेत्रिय कार्यालयाला प्राप्त झालेली होती. त्यानुसार पडताळणी केली असता कामाच्या निविदा प्रक्रीयेमध्ये कंत्राटदाराने ऑनलाईन सादर केलेल्या दस्तऐवजांपैकी Work Done प्रमाणपत्र बनावट असल्याचे आढळुन आलेले आहे.

याबाबत शासन निर्णय दिनांक १८/१०/२०२३ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. दिनांक १४/१२/२०२५ रोजी शेगांव शहर पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार देण्यात आली असून दिनांक २२/१२/२०२५ रोजी मे. निलेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस प्रशासनामार्फत सुरू असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. कंत्राटदाराची २% सुरक्षा ठेव रक्कम (रुपये ३१,२८,०००) या रक्कमेच्या २ बँक गॅरंटी या अनुक्रमे दिनांक ०६/०८/२०२८ व दिनांक १७/०८/२०२९ पर्यंत वैद्य आहेत. सदर बँक गॅरंटींचे रोखीकरणाबाबत महामंडळामार्फत बँकेला कळविलेले असून बँक गॅरंटीचे रोखीकरण करुन सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येत आहे. तसेच सदर कंत्राटदारास जलसंपदा विभागाच्या कोणत्याही निविदा प्रक्रियेत तीन वर्षांसाठी प्रतिबंधित करण्याबाबतचा प्रस्ताव प्रादेशिक कार्यालयामार्फत शासनास प्राप्त असून कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील समाजकार्य महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेतर रिक्त पदांची भरती करण्याबाबत

**(३) * ६९७२ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रामध्ये एकूण ५२ समाजकार्य महाविद्यालये असून, या महाविद्यालयांमध्ये सन २०१७ पासून आजतागायत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कोणतीही नियमित भरती झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रातील समाजकार्य महाविद्यालये पूर्वी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत होती व सध्या ती उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत वर्ग करण्यात आली आहेत, तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत वरिष्ठ महाविद्यालयांमधील सुमारे ५,५०० अध्यापक पदे व सुमारे ३,००० शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाजकार्य महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेतर रिक्त पदांची भरती करण्यासाठी शासनाने मंजुरी देऊनही सदर दीर्घकाळापासून रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात एकूण ६९ समाजकार्य महाविद्यालये असून त्यापैकी ४९ समाजकार्य महाविद्यालये अनुदानित, १ अंशत: अनुदानित तर १९ महाविद्यालये विनाअनुदानित तत्वावर सुरु आहेत.

राज्यातील अनुदानित समाजकार्य महाविद्यालयांमधील प्राचार्य संवर्गातील पदे भरण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ०४/०८/२०२२ नुसार मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत अनुदानित व अंशत: अनुदानित समाजकार्य महाविद्यालयांमध्ये शिक्षकीय संवर्गाची अनुज्ञेय पदे ८२१ व शिक्षकेतर ८८१ अशी एकूण १७०२ पदे अनुज्ञेय ठरत असून, त्यापैकी शिक्षकीय ५०८ व शिक्षकेतर ५८५ पदे अशी एकूण १०९३ पदे कार्यरत असून शिक्षकीय ३१३ व शिक्षकेतर २९६ अशी एकूण ६०९ पदे रिक्त आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दिनांक २९/०२/२०२४ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारितील समाजकार्य महाविद्यालय (बीएसडब्ल्यू/एमएसडब्ल्यू अभ्यासक्रम) हा विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक संवर्गातील एकूण रिक्त ११९१८ पदांपैकी ५०१२ पदांच्या पदभरतीस शासन निर्णय दिनांक ११/०२/२०२६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

तथापि, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर गट-क व गट-ड संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील एकूण २५७३४ पदांपैकी १७७३३ पदे भरलेली असून ८११४ पदे रिक्त आहेत.

(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन पत्र दिनांक २४/०३/२०२५ अन्वये, समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्य संवर्गातील पदे भरण्यास मान्यता दिलेल्या संस्थांना संगणक प्रणालीद्वारे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहेत.

शिक्षक व शिक्षकेतर संवर्गाचा आकृतिबंध अंतिम करुन त्यानुसार पदभरतीची कार्यवाही करण्याची बाब विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मसूर (ता.कराड, जि.सातारा) परिसरातील कृष्णा नदीवर कायमस्वरुपी बंधारा बांधण्याबाबत

**(४) * ७१०३ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मसूर येथील कवठे-भुयाचीवाडी (जि.सातारा) यादरम्यान असलेल्या कृष्णा नदीवरील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा वाहून गेल्यामुळे सदर ठिकाणी पाणीसाठा होत नसून, परिणामी उन्हाळयामध्ये

परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याची टंचाई भासत असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधाऱ्यात पाणीसाठा होण्यासाठी जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी विभागामार्फत तात्पुरता बांध घालण्याचे काम सध्या गतीने सुरू असून सदर बंधाऱ्याच्या खालच्या बाजूस नवीन कायमस्वरूपी बंधारा बांधण्यासाठी बोअर मारून जमिनीचा थर पाहण्याचे (भू-तांत्रिक चाचणी) काम सुरू करण्याबाबतची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मसूर येथील कवठे-भुयाचीवाडी (जि.सातारा) यादरम्यान असलेल्या कृष्णा नदीवर कायमस्वरूपी बंधारा बांधून उन्हाळयात शेतकऱ्यांची शेतीसाठीची पाण्याची टंचाई दूर करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

जुलै २०२४ मध्ये कृष्णा नदीवरील भुयाची वाडी ता.कराड. जि.सातारा येथील भुयाची वाडी को.प.बंधाऱ्यांच्या डाव्या तिराकडील ६ स्तंभांचे नुकसान झाल्याने यांत्रिकी संघटनेच्या सहाय्याने नुकसानग्रस्त भागामध्ये तात्पुरता मातीभराव करुन बंधाऱ्यामध्ये पाणीसाठा करण्यात आला आहे. सदर तात्पुरत्या मातीभरावाचे देखील सन २०२५ च्या अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरामुळे नुकसान झाले आहे. सदर मातीभरावाची दुरुस्ती यांत्रिकी संघटनेमार्फत हाती घेण्यात येत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

भुयाची वाडी कोपबंधाऱ्यांच्या खालील बाजूस नवीन कायमस्वरुपी बंधारा बांधणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी क्षेत्रिय कार्यालयाकडे मागणी केली आहे. त्या अनुषंगाने बंधाऱ्याच्या खालच्या बाजूस नवीन कायमस्वरुपी बंधारा (बॅरेज) बांधण्याच्या दृष्टीने भूतांत्रिक तपासणी करुन जमिनीचा थर पाहण्याचे (भू-तांत्रिक चाचणी) करण्याचे कामास महामंडळाने मंजुरी दिली असून त्यानुसार सदर काम प्रगतीपथावर आहे.
(३) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांचेकडून संकल्पन तयार करणे प्रगतीत असून त्यानंतर सदर कामाचा प्रशासकीय मान्यतेबाबतचा प्रस्ताव विहित मार्गाने शासनास सादर करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात हमीभावाने तूर खरेदी सुरू करण्याबाबत

**(५) * ७५५६ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तूर, हरभरा आदी कडधान्यांच्या बाबतीत कर्नाटक व गुजरात राज्यांमध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हमीभावाने खरेदी सुरू करण्यात आलेली असताना, राज्यात अद्याप हमीभावाने तूर खरेदी सुरू झालेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात हमीभावाने तूर खरेदी सुरू न झाल्यामुळे शेतकऱ्यांना आपला माल खुल्या बाजारात हमीभावापेक्षा कमी दराने विकावा लागत असल्यामुळे खाजगी व्यापारी व दलालांकडून

शेतकऱ्यांची लूट होत असल्याच्या तक्रारी वाढत असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्नाटक व गुजरात राज्यांमध्ये तूर खरेदीसाठी केंद्र शासनाकडून परवानगी देण्यात आलेली असताना, महाराष्ट्रासाठी अशी परवानगी मिळण्यास विलंब होत असल्याची कारणे काय आहेत, तसेच याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा केला आहे व त्याचा तपशील काय आहे,
(४) असल्यास, राज्यात तातडीने हमीभावाने तूर खरेदी सुरू करण्याबाबत, तसेच शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी भावांतर योजना किंवा अन्य तात्पुरत्या उपाययोजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) व (२) हे खरे नाही.

किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत हमीभावाने तूर खरेदीसाठी दिनांक २० जानेवारी, २०२६ पासून शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरु करण्यात आली असून सद्य:स्थिती तूर नोंदणी करिता दिनांक २४ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तर दिनांक १ फेब्रुवारी, २०२६ पासून प्रत्यक्ष तूर खरेदी सुरू करण्यात आली आहे.

कृषी विभागाच्या द्वितीय प्राथमिक अंदाजानुसार रब्बी हंगाम २०२६ मधील हरभरा खरेदीसाठी दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून दिनांक १ मार्च, २०२६ पासून दिनांक ३१ मार्च, २०२६ या कालावधीत हरभरा खरेदीसाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरू करण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे.
(३) व (४) हंगाम २०२५-२६ साठी कृषी विभागाकडून प्राप्त झालेल्या पूर्व प्राथमिक आगाऊ अंदाजानुसार राज्यात तूर खरेदीस मंजूरी देणेबाबत दिनांक ५ डिसेंबर, २०२५ रोजी केंद्रीय कृषी मंत्रालयास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.त्यानुसार केंद्रीय कृषी मंत्रालयाने दिनांक २५ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये हंगाम २०२५-२६ मध्ये राज्यासाठी ३,३७,००० मे.टन खरेदीस मंजूरी दिली आहे. सद्य:स्थितीत राज्यात दिनांक १ फेब्रुवारी, २०२६ ते दिनांक १ मे, २०२६ पर्यंत हमीभावाने तूर खरेदी प्रक्रीया राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या पिकाला हमीभाव मिळत नसल्याबाबत

**(६) * ७६७८ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, डॉ.परिणय फुके, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात झालेल्या सततच्या पावसामुळे यंदाच्या खरीप हंगामातील सोयाबीन पिकाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आला असून, शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकाला योग्य दर मिळावा यासाठी शासनामार्फत हमीभावाने सोयाबीन खरेदी करणे आवश्यक असतानाही दिनांक १५ नोव्हेंबर, २०२५ पासून हमीभावाने सोयाबीन खरेदी सुरू झाली असून, १८.५०

लाख टन उद्दिष्ट असताना दीड महिन्याच्या कालावधीत तुलनेत केवळ पाच लाख टन सोयाबीनची खरेदी झाली असून केवळ दर्जा अयोग्य असल्याचे कारण देऊन खरेदी नाकारली जात असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गतवर्षी राज्यात प्रथमच सुमारे ५ लाख ११ हजार ६५७ शेतकऱ्यांकडून ११.२१ लाख टन सोयाबीनची हमीभावाने खरेदी करण्यात आली असताना यावर्षी मात्र अवकाळी पावसामुळे सोयाबीन भिजणे, आर्द्रतेचे प्रमाण वाढणे व सोयाबीन काळे पडणे या कारणांमुळे १८० कोटी रुपये किमतीची सुमारे ६.८१ लाख पोती (सव्वातीन लाख टन) सोयाबीन खरेदीस नाकारण्यात आल्याने शेतकऱ्यांना खाजगी बाजारात कवडीमोल दराने सोयाबीन विकावे लागत असून, सोयाबीन पेंडीवरील निर्यात बंदी उठवावी, कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी सोयाबीनची हमीभावाने खरेदी करावी व अतिवृष्टीमुळे उत्पादन घटलेल्या शेतकऱ्यांना योग्य भाव द्यावा अशा मागण्या शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत सुमारे पाच लाख शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी शिल्लक असून दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ पर्यंतची मुदत संपत आली असतानाही संथ गतीमुळे खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण होण्यात अडचणी येत असल्याने खरेदी प्रक्रियेतील या दिरंगाईमुळे शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सोयाबीन खरेदीसाठी आर्द्रतेची मर्यादा १२ टक्क्यांवरून १५ टक्के करून देखील मोठ्या प्रमाणावर सोयाबीन नाकारले जात असल्याने अवकाळी पावसामुळे दर्जा खालावलेल्या सोयाबीनची खरेदी वाढविण्याबाबत तसेच सोयाबीन खरेदीची मुदत वाढवून देण्यात यावी व आर्द्रतेच्या निकषांमध्ये शिथिलता, पर्यायी निकष अथवा नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या किमान आधारभूत योजनेंतर्गत राज्यात सोयाबीन खरेदीसाठी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ पासून शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व दिनांक १५ नोव्हेंबर, २०२५ पासून प्रत्यक्ष खरेदी सुरू करण्यात आली. सदर खरेदीचा ९० दिवसांचा कालावधी दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत होता.राज्यात खरेदीच्या शेवटच्या दिनांकाअखेर नाफेड व एनसीसीएफ यांच्यावतीने ९३४ खरेदी केंद्रांमार्फत एकूण २,३८,९१६ शेतकऱ्यांकडून ६.२० लाख मे.टन सोयाबीन खरेदी करण्यात आला आहे. सोयाबीन खरेदीकरिता १ महिन्याची मुदतवाढ देण्यासाठी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

सांगली जिल्ह्यात विष्णू आण्णा सहकारी खरेदी विक्री संघ लि. सांगली व आर.आर.पाटील शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ मर्या., तासगांव या केंद्रांवर सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक निकषांनुसार सरासरी गुणवत्ता (एफएक्यु) दर्जाचा सोयाबीन खरेदी करण्यात आला आहे.

सांगली जिल्ह्यात सांगली सेंटरवर ५४ शेतकऱ्यांकडून ९७४ क्विंटल व तासगांव सेंटरवर १३८ शेतकऱ्यांकडून १७१७ क्विंटल असा एकूण २६९१ क्विंटल सोयाबीन खरेदी करण्यात आला आहे. त्यापोटी एकूण १,४६,३७,६४८ इतक्या रक्कमेचे शेतकरी चुकारे संबंधित शेतकऱ्यांना अदा करण्यात आले आहे.

सांगली जिल्ह्यात सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी केलेल्या सर्व ४१० शेतकऱ्यांना एसएमएस देवून सोयाबीन खरेदी करीता बोलविण्यात आलेले होते. सांगली जिल्ह्यात आद्रतेच्या कारणास्तव कोणत्याही शेतकऱ्याचा माल नाकारण्यात आला नाही. नाफेडने दिलेल्या निकषानुसार एफएक्यु दर्जाचा सोयाबीन खरेदी करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनामार्फत सोयाबीन पेंडवर (Soybean meal or de-oiled cake) सद्य:स्थितीत कोणतीही निर्यातबंदी लावण्यात आलेली नाही. सदर धोरणात कोणताही बदल झाल्याचे दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## मुंबई विभागातील औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका महाविद्यालयांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(७)** * **६८३८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विभागातील औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या एकूण २७ महाविद्यालयांमध्ये आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव असून यामध्ये ठाणे जिल्ह्यातील सर्वाधिक १५ महाविद्यालयांचा समावेश असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन शैक्षणिक वर्षांत औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, या कालावधीत पदवी अभ्यासक्रमाच्या ९२ व पदविका अभ्यासक्रमाच्या २२० महाविद्यालयांना मान्यता देण्यात आली होती, मात्र या महाविद्यालयांमध्ये भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषद पीसीआयच्या स्टॅण्डर्ड इन्स्पेक्शन फॉरमॅटनुसार ((PCI) यांच्या 'Standard Inspection Format') आवश्यक सुविधांचा अभाव असल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तपासणीदरम्यान प्रयोगशाळा, ग्रंथालय, औषधनिर्मिती उपकरणे, इमारत, अभ्यासवर्ग (Classrooms) इत्यादी अत्यावश्यक बाबींमध्ये त्रुटी आढळून आल्या असून, शासन व तंत्र शिक्षण संचालनालयाने वेळोवेळी सूचना देऊनही संबंधित महाविद्यालयांनी अद्याप त्यांची पूर्तता केली नसल्यामुळे मुंबई विभागातील २७ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांची मान्यता धोक्यात आली असून, सुविधांच्या अभावाबाबत तंत्र शिक्षण संचालनालयाने माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये नोटीस बजावलेल्या १७६ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांची यादी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सर्व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांची सखोल तपासणी करून सर्व महाविद्यालयांमध्ये आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, तसेच विद्यार्थ्यांकडून समान व नियमानुसार शुल्क आकारले जावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन शैक्षणिक वर्षांत औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या ९२ व पदविका अभ्यासक्रमाच्या २२० महाविद्यालयांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यापैकी काही औषधनिर्माणशास्त्र पदविका व पदवी संस्थांबाबत तक्रारी शासनाकडे प्राप्त झालेल्या होत्या. त्यानुषंगाने, सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका आणि पदवी संस्थांची, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने निर्धारित केल्यानुसार शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे, यासंदर्भात अनुक्रमे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ आणि तंत्र शिक्षण संचालनालय यांच्यामार्फत फेरतपासणी करण्यात आली. याबाबत, दिनांक २९/०७/२०२५ रोजी शासनस्तरावर बैठक होऊन, त्रुटी असलेल्या सर्व संस्थांकडून खुलासा घेण्याचे निर्देश देण्यात आले. त्यामध्ये मुंबई विभागातील २७ संस्थांचा समावेश होता.सदर २७ संस्थांमध्ये ठाणे जिल्ह्यातील १४ संस्था होत्या. त्यापैकी असमाधानकारक खुलासा असलेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या २ व पदविका अभ्यासक्रमाच्या ४ संस्था होत्या. तपासणी करण्यात आलेल्या सर्व संस्थांपैकी आवश्यक निकष पूर्ण करीत नसलेल्या पदवी अभ्यासक्रमांच्या १८ आणि पदविका अभ्यासक्रमांच्या ७१ संस्थांची नावे फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.

(४) तपासणीमध्ये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या ३० पदवी आणि १२८ पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांपैकी १८ पदवी व ७१ पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याचे आढळून आले. या संस्थांची नावे शासनामार्फत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांना दिनांक १५/०९/२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आली होती. सदर पत्रास अनुसरून, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रम चालवणाऱ्या अनुक्रमे १८ व ७१ संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्ष प्रवेश करण्यात येऊ नये, असे दिनांक २६/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले. तदनंतर काही संस्थांनी विभागाकडे पुनर्पडताळणीसाठी निवेदने सादर केली असता, पुनर्पडताळणीअंती ४२ संस्थांनी (३४ पदविका व ८ पदवी अभ्यासक्रम) त्रुटींची पूर्तता केल्याने सदर संस्थांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी करुन घेण्यात आले. दरम्यानच्या कालावधीत उपरोक्त नमुद काही पदविका व पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्थांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केल्या होत्या. सदर न्यायालयीन प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक १३/१०/२०२५ रोजीचे आदेश विचारात घेऊन, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक १६/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये यापूर्वीच्या त्यांच्या दिनांक २६/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेले, १८ पदवी व ७१ पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये प्रवेश न करण्याचे आदेश मागे घेऊन, सदर संस्थांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी करुन घेण्याबाबत कळविले. औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची शिखर संस्था असलेल्या फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी संस्थांमध्ये प्रवेश न करण्याबाबतचे निर्देश मागे घेतले असल्यामुळे या संस्थांवर दंडात्मक कारवाई किंवा शुल्क कमी करणे अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(५) लागू नाही.

-----------------

## उल्हासनगर येथील श्रीमती चांदिबाई हिम्मतमल मन्सुखानी कॉलेजमधील प्रायार्य मान्यता आणि शैक्षणिक गैरप्रकारांची चौकशी करण्याबाबत

**(८) * ७०१५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीमती चांदिबाई हिम्मतमल मन्सुखानी कॉलेज उल्हासनगर (जि.ठाणे) येथील प्राचार्या यांच्याकडे दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र व शाळा सोडल्याचा दाखला उपलब्ध नसतानाही त्यांना शिक्षक व प्राचार्य पदाची मान्यता देण्यात आली आहे तसेच त्याच्यावर टी.वाय.बी.कॉम. (सिंधी विषय) च्या उत्तरपत्रिकांची अवैधरित्या फेरतपासणी, गुणवाढ व गेल्या अनेक वर्षांपासून ग्रंथालयासाठी पुस्तक खरेदी न केल्याबाबत गंभीर तक्रारी प्राप्त होऊनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कॉलेजच्या प्राचार्या यांच्याकडे दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र व शाळा सोडल्याचा दाखला उपलब्ध नसतानाही मुंबई विद्यापीठातील संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमताने शिक्षक व प्राचार्य पदाची मान्यता दिली असून, मुंबई विद्यापीठ व शासनाकडून वेळोवेळी पाठविण्यात आलेल्या कोणत्याही पत्रव्यवहारास जबाबदारीने उत्तर देत नाहीत तसेच स्वतःचे दहावीचे प्रमाणपत्र व शाळा सोडल्याचा दाखला विद्यापीठ व शासनाकडे सादर करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने फसवणूक करून शिक्षक व प्राचार्य पदाची मान्यता मिळविणाऱ्या सी.एच.एम. कॉलेजच्या प्राचार्या यांची मान्यता रद्द करण्याबाबत तसेच त्यांना मदत करणाऱ्या मुंबई विद्यापीठातील सर्व संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) श्रीमती चांदिबाई हिम्मतमल मन्सुखानी कॉलेज, उल्हासनगर, जि.ठाणे या महाविद्यालयातील प्राचार्या डॉ. मंजु पाठक या सहाय्यक प्राध्यापक, इकॉनॉमिक्स या पदावर दिनांक २ जानेवारी, १९९८ पासून कार्यरत आहेत. नियुक्तीवेळी डॉ. मंजु पाठक यांनी अकरावी, बी.ए., एम.ए., एम.फिल व पी.एच.डी. ही शैक्षणिक कागदपत्रे विद्यापीठाकडे सादर केली होती. डॉ. पाठक यांनी १९८४ मध्ये मध्यप्रदेश बोर्डातून ११+३+२ या पध्दतीनुसार ११ वी इंटरमिजिएट ही परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. श्रीमती पाठक यांच्या नियुक्तीस मुंबई विद्यापीठाचे पत्र दिनांक १३ जानेवारी, १९९९ अन्वये नियमानुसार नियमित मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पात्रता धारण करत असल्याने विद्यापीठाने त्यांच्या प्राचार्य पदावरील नियुक्तीस नियमानुसार मान्यता दिलेली आहे.

पुस्तक खरेदी न करण्याबाबत विद्यापीठाने महाविद्यालयाकडून तपशील मागितला आहे. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,मुंबई या कार्यालयात तक्रार प्राप्त झालेली नाही.

महाविद्यालयातील T.Y.B.Com (Sem-V) अभ्यासक्रमातील Literature in Sindhi विषयाची परीक्षा मूल्यमापन, पुनर्मूल्यांकन व ATKT च्या परीक्षेची पेपर तपासणी या प्रकरणाबाबत प्राप्त तक्रारीची चौकशी करण्याकरीता मुंबई विद्यापीठाने डॉ. शिवाजी सरगर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. सदर समितीच्या शिफारशीनुसार महाविद्यालयाकडून मागविण्यात आलेला खुलासा

विद्यापीठाने समितीकडे पाठविला आहे. समितीच्या अहवालानुसार विद्यापीठाकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) मुंबई विद्यापीठाने परीक्षा मूल्यांकन व पुनर्मुल्यांकनाबाबत डॉ. शिवाजी सरगर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे, व त्यानुसार समितीची कार्यवाही सुरु आहे.

श्रीमती पाठक यांच्या अध्यापक आणि प्राचार्य पदावरील नियुक्तीस विद्यापीठाने नियमानुसार मान्यता दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ऊसतोडणी कामगारांच्या शालेय वयोगटातील मुलांसाठी शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(९) * ७१६० श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखान्यांच्या अनास्थेमुळे राज्यात ऊसतोडणी कामगारांच्या स्थलांतरित कुटुंबातील शालेय वयोगटातील मुलांसाठी पूर्वी उपलब्ध असलेल्या शिक्षण सुविधांचा ऱ्हास झाल्याने, सुमारे १ लाख मुले शाळाबाह्य होण्याची शक्यता निर्माण झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या अशा मुलांसाठी स्वतंत्र अथवा पर्यायी शैक्षणिक व्यवस्था प्रत्यक्षात कार्यरत नसली तरी ऊसतोडणी कामगारांच्या शालेय वयोगटातील मुलांसाठी संबंधित साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत यावर्षी साखर आयुक्तांनी स्पष्ट आदेश दिले असून, सदर आदेश निर्गमित होऊनही एकाही साखर कारखान्याने ऊसतोडणी कामगारांच्या शालेय मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेली अध्यापन व्यवस्था, त्यांच्या प्रवासाची, निवासाची अथवा आहाराची स्वतंत्र व प्रभावी व्यवस्था केल्याचे प्रत्यक्षात आढळून आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने साखर आयुक्तांच्या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित साखर कारखान्यांवर जबाबदारी निश्चित करून शासनाने कोणती कारवाई केली तसेच ऊसतोडणी कामगारांच्या स्थलांतरित मुलांचे शिक्षण सुरक्षित व सातत्यपूर्ण राहावे यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) व (२) नाही.

(३) तथापि, ऊसतोडणी कामगारांच्या स्थलांतरित मुलांचे शिक्षण सुरक्षित व सातत्यपूर्ण राहावे यासाठी साखर आयुक्त, पुणे यांनी दिनांक ०३/०७/२०२५ रोजीच्या परिपत्रकांन्वये सर्व कारखान्यांना सूचना दिलेल्या आहेत तसेच ऊसतोड कामगाराच्या विविध समस्याबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल सुमोटो याचिका क्र.०१/२०२३ अंतर्गत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सन-२०२५-२६ या गाळप हंगामध्ये दिनांक २८/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये जिल्हास्तरीय समिती गठीत करणेत आली असून त्याद्वारे ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाबाबत सातत्याने आढावा घेण्याच्या सर्व कारखान्यांना व शिक्षण विभागास सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्थेंतर्गत घरे उपलब्ध करून देण्याबाबत

**(१०) * ७८६४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील पोलीस वसाहतीमध्ये राहत असलेल्या पोलीस कर्मचारी यांना घरकुल योजनेंतर्गत (पोलीस हौसिंग) मालकी हक्काची घरे देण्यासाठी सन २०१० साली पोलीस परिपत्रकाद्वारे प्रकल्पाची घोषणा करण्यात येऊन त्याप्रमाणे ५,२०० पोलिसांनी या प्रकल्पाकरीता प्रत्येकी ५० हजार रुपये भरुन नोंदणी केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी पनवेल येथे १२२ एकर जमीन खरेदी करण्यात आली असून प्रकल्पाची जबाबदारी पूर्ण करण्याकरिता काही अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन घराचे स्वप्न पाहणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांकडून रुपये ५० हजार ते ३ लाखपर्यंतची रक्कम घेऊन रुपये ५० कोटी जमा करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी आर्थिक गैरव्यवहार झाल्यामुळे प्रकल्पाचे बांधकाम अद्यापही करण्यात आले नसून, लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २० जुलै, २०२५ रोजी दिलेल्या निवेदनानुसार मा.मुख्यमंत्री यांनी याकरिता स्थापन झालेल्या समन्वय समितीची संयुक्त बैठक आयोजित केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या मालकीची घरे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१),(२),(३) व (४) अंशत: खरे आहे.

"नियोजित बृहन्मुंबई पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या." वायाळ, ता.खालापूर जि.रायगड या संस्थेचे मुख्य प्रवर्तक श्री.प्रताप दिघावकर यांनी दिनांक ०६/०३/२०१२ रोजी नियोजित संस्थेचे नाव नोंदणीसाठी राखून ठेवणे व बँकेत संस्थेच्या नावे खाते उघडण्यास सहायक निबंधक, सहकारी संस्था, खालापूर यांचेकडे परवानगी मागितली होती. त्यानुसार दिनांक १७/०३/२०१२ च्या पत्रान्वये संस्थेचे नाव नोंदणीसाठी राखून ठेवणे व बँकेत संस्थेच्या नावे खाते उघडण्यास परवानगी देण्यात आली होती.

सदर नियोजित गृहनिर्माण संस्थेने त्यांच्या स्तरावर दिनांक ०९/०७/२०१२ अन्वये "विशेष पोलीस पत्रक" या नावाने पत्रक काढून, सभासदांकडून प्रकल्पासाठी वर्गणी गोळा केल्याचे दिसून येते.

सहकार विभागाने सदर नियोजित गृहनिर्माण संस्थेची दिनांक १७/०७/२०१९ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २४ कलम ९ (१) अन्वये नोंद केली आहे. नोंदणीवेळी संस्थेचे ४६०२ सभासद होते. सद्य:स्थितीत त्यानंतर समाविष्ट सभासदांसह संस्थेचे ४८१४ सभासद आहेत.

संस्थेच्या काही सभासदांनी विनापरवानगी कंत्राटदार नेमून रुपये १५ कोटी परस्पर अदा करणे, जमीन खरेदीमधील अनियमितता, इ.बाबत तक्रारी प्राप्त झाल्याने, आर्थिक अनियमिततेच्या तपासाच्या अनुषंगाने, संस्थेचे सन २०१२ ते २०२२ या कालावधीचे फेरलेखापरिक्षण करण्यासाठी विशेष

लेखापरिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था यांची नेमणूक करण्यात आली असून, फेर लेखापरिक्षण कामकाज अंतिम टप्प्यात आहे.

तसेच संस्थेने नियमित निवडणूक घेण्यास कसूर केल्याने, सहकार कायदयाचे कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकाऱ्याची नेमणूक करुन निवडणूक घेऊन, ऑक्टोबर, २०२३ पासून संस्थेची नवीन व्यवस्थापन समिती अस्तित्वात आली आहे.

मा.लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २०/०७/२०२५ रोजी दिलेले निवेदन व संस्थेच्या समन्वय समितीच्या संयुक्त बैठकीबाबत सहकार विभागात कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यामध्ये २३ बोगस सहकारी संस्थांची नोंदणी केल्याबाबत

**(११)** * **७८७१ श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यामध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड आणि पत्ता यांसारख्या आवश्यक ‘केवायसी’ (KYC) कागदपत्रांची पूर्तता न करताच उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयामार्फत प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या सुमारे २३ बोगस सहकारी संस्थांची नोंदणी करण्यात आल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बोगस संस्थांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासदत्व व मतदानाचा अधिकार मिळविण्याच्या उद्देशाने नियमांचे उल्लंघन करून सुमारे १४६ कोटी रुपयांचे बेकायदेशीर कर्जवाटप केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकारी तसेच बोगस संस्थाची नोंदणी करणाऱ्या प्रवर्तकांवर कोणती कारवाई केली आहे तसेच सदर संस्थांची नोंदणी रद्द करण्याबाबत तसेच संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१), (२) व (३) नाही,

नाशिक जिल्ह्यामध्ये सन २०२५ ते माहे जानेवारी, २०२६ या कालावधीमध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतूदीनुसार प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था-०, नागरी व ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था आणि पगारदार पत संस्था-०७, सहकारी गृहनिर्माण संस्था-३८ व इतर सहकारी संस्था-१६ अशा प्रकारे एकूण ६१ सहकारी संस्थांची नोंदणी करण्यात आली आहे.

सदर संस्थांची नोंदणी करताना सहकारी संस्थांच्या नोंदणीसाठी निश्चित केलेल्या निकषाची पुर्तता करुन आणि सभासदांची के.वाय.सी. प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतरच सदर संस्थांची नोंदणी करण्यात आली आहे.

नाशिक जिल्ह्यात सन २०२५ ते जानेवारी, २०२६ या कालावधीत नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नाशिक या बँकेने ०९ सहकारी संस्थांना नव्याने सभासदत्व दिले आहे. सदर ०९ संस्था या प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था नसून इतर प्रकारच्या संस्था आहेत. बँकेची आर्थिक स्थिती विचारात घेऊन नव्याने सभासद झालेल्या सहकारी संस्थांना कर्ज वितरण केलेले नाही. तसेच नाशिक जिल्ह्यात सहकारी संस्था नोंदणीच्या अनुषंगाने तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत. त्याचप्रमाणे बोगस सहकारी संस्था नोंदणी आणि नियमांचे उल्लंघन करुन कर्ज वितरण करण्यात आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्याच्या योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१२) * ७९९५ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला सक्षमीकरणासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्याचा निर्णय शासनाने माहे जून, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेबाबत संबंधित यंत्रणेमार्फत प्रभावी जनजागृती न झाल्यामुळे नांदेड जिल्ह्यात माहे डिसेंबर, २०२५ अखेर केवळ एकच प्रस्ताव प्राप्त झाला असून तोही आवश्यक पडताळणीअभावी प्रलंबित असून संबंधित यंत्रणेच्या उदासीन व निष्क्रिय धोरणामुळे महिला सक्षमीकरणाच्या उद्दिष्टाला बाधा येत असून सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी न झाल्याने या योजनेचा अपेक्षित लाभ महिलांपर्यंत पोहोचलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्याबाबत प्रभावीपणे जनजागृती न करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे तसेच सदर योजनेची सक्षमपणे अंमलबजावणी करुन महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे या कार्यालयाने दिनांक ११/०६/२०२५ च्या परिपत्रकान्वये सविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड कार्यालयास माहे दिनांक २९/०८/२०२५ रोजी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाडकी बहीण क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. नांदेड या संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांचे नावे बँक खाते उघडण्यास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यास त्यांनी दिनांक १७/१०/२०२५ रोजी बँकेमध्ये खाते उघडण्यास परवानगी दिलेली आहे. तद्‌नंतर सदरील संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांचेकडून संस्था नोंदणी करणेबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड कार्यालयास अद्याप प्राप्त झाला नाही.

(३) लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्याबाबतच्या निर्णयाच्या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे या कार्यालयाने दिनांक ११/०६/२०२५ च्या परिपत्रकान्वये सविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भडगाव (जि.जळगाव) येथील दोन बालकांचा शाळेच्या आवारालगत असलेल्या उघड्या नाल्यात बुडून मृत्यू झाल्याबाबत

**(१३) * ८२२० डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भडगाव शहर (जि.जळगाव) येथील एका शाळेच्या नर्सरी वर्गातील चार वर्षांच्या दोन चिमुकल्यांचा शाळेच्या आवारालगत असलेल्या उघड्या नाल्यात पडून बुडून मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेच्या ठिकाणी शाळा परिसरात आवश्यक सुरक्षा उपाययोजना, संरक्षण भिंत, नाल्यावर झाकण किंवा कुंपण न उभारणे तसेच लहान मुलांवर पुरेशी देखरेख न ठेवणे याकडे शाळा प्रशासनाचे गंभीर दुर्लक्ष होत असल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील इतर शाळा, अंगणवाड्या व नर्सरी शाळांच्या परिसरातही उघडे नाले, खड्डे किंवा धोकादायक संरचना असल्याचे प्रकार निदर्शनास आले असून शासनाकडून याबाबत कोणती राज्यव्यापी तपासणी किंवा पाहणी मोहीम राबविण्यात आली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त घटनेप्रकरणी संबंधित शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे जबाबदार अधिकारी यांच्यावर कोणती फौजदारी किंवा शिस्तभंगात्मक कारवाई केली तसेच भविष्यात शाळा व बालकांच्या सुरक्षिततेसाठी शाळा परिसर सुरक्षा नियम अधिक कडक करण्याबाबत आणि अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) समग्र शिक्षा अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची संरक्षक भिंत बांधणे, खेळाची मैदाने, नवीन खोल्या उभारणे, खोल्यांची दुरुस्ती करणे, इत्यादी करिता निधी उपलब्ध करून देण्यात येत असतो.

तसेच, दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील भौतिक सुविधांच्या विकासाकरीता विविध स्त्रोतांचा वापर करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

तथापि, प्रस्तुत प्रकरणातील शाळा ही स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावरील शाळा असल्याने या शाळेची संरक्षक भिंत बांधणे आणि इतर सुविधांची उपलब्धता करणे ही सर्वस्वी त्या शाळेची जबाबदारी आहे.

(४) सदर घटना स्थळी दिनांक १७/१२/२०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी देखील भेट दिलेली आहे. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती भडगाव यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, सदर प्रकरणी भडगाव पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०५, १०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या अहवालामध्ये, सदर घटनेस शाळेचे संस्थाचालक, संचालक मंडळ, प्राचार्य व वर्गशिक्षक कारणीभूत असल्याचे नमूद करण्यात आलेले असून सदर प्रकरणात मुख्याध्यापकासह इतर ५ व्यक्तींना अटक करण्यात आली होती. तथापि, सद्य:स्थितीत प्रकरण हे न्यायप्रविष्ट आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील शाळांना महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ लागू असून सदर अधिनियमातील तरतुदींचे सर्व स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील शाळांनी पालन करणे आवश्यक आहे.

तसेच, ३ ते ६ वयोगटातील बालकांना गुणवत्तापूर्ण सुरक्षित, खेळाधारीत व बालकेंद्रीत शिक्षण उपलब्ध व्हावे याकरीता खाजगी बालवाटिकांच्या (पूर्व प्राथमिक शिक्षण संस्था) नोंदणी संदर्भात अधिनियम प्रस्तावित करण्यात येणार आहे. सदर अधिनियमाचा मुख्य उद्देश राज्यातील सर्व खाजगी बालवाटिकांची अनिवार्य नोंदणी, नियमन व गुणवत्ता सुनिश्चित करणे हा असणार आहे. या अधिनियमाअंतर्गत बालवाटिकांच्या नोंदणीसाठी सक्षम प्राधिकरणाची नेमणूक, ऑनलाइन पोर्टलद्वारे नोंदणी प्रक्रिया, नोंदणीची वैधता (३ वर्षे) व नूतनीकरणाची तरतूद करण्यात येणार आहे. नोंदणीविना कोणतीही बालवाटिका चालविण्यास मनाई करण्यात येणार आहे.

सदर अधिनियमामध्ये बालवाटिकांवर किमान गुणवत्ता मानके बंधनकारक करण्यात येणार असून, त्यामध्ये ३-४ तासांचा ECCE कार्यक्रम, १:२० शिक्षक-बालक प्रमाण, बालकेंद्रित अभ्यासक्रम, खेळणी व आनंददायी शिक्षण साहित्य, तसेच सुरक्षित व बालस्नेही पायाभूत सुविधा यांचा समावेश असणार आहे. प्रस्तावित अधिनियमाधील तरतुदींचा नियमभंग झाल्यास नोंदणी रद्द करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरणास देण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागातील एल.एल.एम. (द्वितीय वर्ष) च्या विद्यार्थ्यांच्या परिक्षेतील अनियमिततेबाबत

**(१४) * ८३२८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागातील एल.एल.एम. (द्वितीय वर्ष) या अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सेमिस्टर परीक्षांमध्ये अनेक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षा देऊनही 'गैरहजर (Absent)' दर्शविण्यात आले असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच अभ्यासक्रमाच्या माहे मे,२०२५ मधील सेमिस्टर ४ च्या निकालात अनेक त्रुटी आढळून आल्या असून निकाल चुकीच्या पध्दतीने जाहीर करण्यात आल्याने संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एल.एल.एम. अभ्यासक्रमासाठी नवीन प्रवेश प्रक्रिया माहे डिसेंबर महिन्यामध्ये पूर्ण झालेली असताना व सर्वसाधारणपणे सदर अभ्यासक्रमाच्या परीक्षा एप्रिल-मे महिन्यात होत असताना परीक्षा फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अभ्यासक्रमांच्या परिक्षेतील अनियमितता व गोंधळाकरिता जबाबदार संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापि, एल.एल.एम. ग्रुप-१ (संविधानिक कायदा) या विषयातील केवळ एका विद्यार्थ्याचा निकाल संबंधित प्राध्यापिकेकडून अनावधानाने गैरहजर दर्शविण्यात आला होता.सदर बाब निदर्शनास आल्यानंतर संबंधित प्राध्यापिकेकडून प्राप्त झालेल्या निकालपत्रकाची व इतर कागदपत्रांची तपासणी करून संबंधित विद्यार्थ्याचा निकाल दुरुस्त करण्यात आला व पुढील कार्यवाहीसाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे पाठविण्यात आला. त्यानुसार सदर विद्यार्थ्याचा सुधारित निकाल दिनांक २७ जानेवारी, २०२६ रोजी जाहीर करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.

एल.एल.एम. सेमिस्टर-४ च्या परीक्षेत संबंधित विषयातील एका विद्यार्थ्याचे गुण अनावधानाने निकालपत्रकात नोंदविणे राहून गेले होते. सदर बाब निदर्शनास आल्यानंतर तात्काळ आवश्यक तपासणी करून विद्यार्थ्याचा निकाल दुरुस्त करण्यात आला असून परीक्षा व मूल्यमापन मंडळामार्फत सुधारित निकाल जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झालेले नाही.
(३) हे अंशतः खरे आहे.

एल.एल.एम. अभ्यासक्रमासाठी सामाईक प्रवेश प्रक्रियेअंतर्गत अर्ज मागविणे, प्रवेश याद्या जाहीर करणे व अध्यापन सुरू करणे ही प्रक्रिया विद्यापीठाने नियमानुसार पार पाडली आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन सत्र-१ ची परीक्षा वेळेत घेण्यासाठी परीक्षा दिनांक निश्चित करण्यात आले होते. तथापि, विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने व महाविद्यालयांच्या विनंतीनुसार परीक्षेच्या तारखांमध्ये आवश्यक ते बदल करून परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या.
(४) संबंधित प्राध्यापिकेकडून झालेल्या त्रुटीबाबत विद्यापीठाच्या प्रचलित नियमांनुसार दंड आकारण्यात आला असून संबंधित प्राध्यापिकेने तो भरलेला आहे. तसेच सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्यासाठी मुंबई विद्यापीठामार्फत त्रिसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आलेली असून समितीमार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे मुंगी (ता.शेवगांव, जि.अहिल्यानगर) येथील शासकीय मालमत्तेचे नुकसान करून अतिक्रमण केल्याबाबत

**(१५)** * **८३७९ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मुंगी (ता.शेवगांव, जि.अहिल्यानगर) येथील गट नंबर ४१२ व ४१३ मधील शासकीय मालमत्तेचे नुकसान करून अतिक्रमण केल्याबाबतच्या तक्रारी वारंवार संबंधित अधिकारी, मंत्री महोदय यांच्याकडे करण्यात आल्या असून दिनांक २७ मार्च, २०२२ रोजी वा त्यादरम्यान अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक यांनी पोलीस बंदोबस्त देवूनही तत्कालीन अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी अतिक्रमण हटविण्याची कोणतीही कार्यवाही केली नसल्याने शासकीय मालमत्तेवर अतिक्रमण करणाऱ्यांवरही अद्यापपर्यंत कोणतेही गुन्हे दाखल करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अतिक्रमण करणाऱ्यांसोबत आर्थिक हितसंबंध जोपासून व राजकीय दबावामुळे अतिक्रमण करणाऱ्या आरोपींना मदत करण्याकरीता शासकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कामात अनियमितता व दिरंगाई करून शासनाची फसवणूक व दिशाभूल केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे व बेजबाबदारपणामुळे शेतकऱ्यांना शेतीमध्ये जाण्यासाठी रस्ता व शेतीसाठी पाणी मिळत नसल्याने शेकडो शेतकरी पाण्यापासून वंचित राहिले असून, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जानेवारी, २०२६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय व मा.मंत्रीमहोदयांना दिलेल्या पत्रावरही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित बेजबाबदार अधिकारी व दोषींवर तसेच दोषींना पाठीशी घालणाऱ्यां संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

पोलीस अधीक्षक कार्यालय अहिल्यानगर यांच्या दिनांक २७/०३/२०२२ रोजीच्या पत्रानुसार (प्रत्यक्ष प्राप्त दिनांक २५/०४/२०२२) संरक्षण देण्यात आले असून, वितरिका क्र.५ वरील गट क्र.४१२, ४१३ मधील अतिक्रमण काढण्याचे काम पोलीस संरक्षणामध्ये दिनांक २०/०५/२०२२ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे.

दिनांक २८/०२/२०२२ रोजी प्रथम खबर अहवाल (First Information Report) क्र.०१२०, दिनांक २८/०२/२०२२ वेळ २०.१४ वाजता कलम ३५३ व ५०६ अन्वये संबंधित व्यक्तीवर गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

पोलीस संरक्षणामध्ये अतिक्रमण काढण्याचे काम दिनांक २०/०५/२०२२ रोजी पूर्ण करण्यात आलेले असून याबाबत अनियमितता व दिरंगाई झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

सदरील ठिकाणी कालव्याच्या वितरिकेच्या बाजूवरील संपादित क्षेत्रावरील अतिक्रमण काढलेले असून कालव्याच्या बाजूचा रस्ता वहिवाटीसाठी खुला करण्यात आलेला आहे. सदरील ठिकाण पैठण उजवा कालव्यावरील वितरीका क्र. ५ च्या अंतभागातील असून या ठिकाणी गोदावरी नदीवरून उपसा सिंचन सुविधा उपलब्ध होत असल्याने प्रवाही सिंचनाकरीता मागणी दहा ते पंधरा वर्षापासून प्राप्त होत नाही. यानुसार, पर्यायी सिंचन सुविधेमुळे शेतकरी पाण्यापासून वंचित नाहीत.

या विषयाच्या अनुषंगाने मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना दिलेल्या दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने दिनांक १७/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) सदर प्रकरणी मौजे मुंगी गट नं. ४१२, ४१३ मधील अतिक्रमण काढण्याचे काम पोलीस संरक्षणामध्ये प्राधान्याने करण्यात आलेले असून अडवणुक करणाऱ्या विरोधात गुन्हा नोंद केलेला आहे. यानुसार कामात अनियमितता व दिरंगाई केलेली नाही. याकरीता कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या कापूस व सोयाबीनचा हमीभाव सुनिश्चित करण्याकरिता केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत

**(१६) * ८५१८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी केंद्र शासनाने जाहीर केलेला किमान आधारभूत दर (MSP) कापसासाठी रुपये ७,३०० ते ७,९०० प्रति क्विंटल व सोयाबीनसाठी रुपये ४,००० प्रति क्विंटल असा असतानाही प्रत्यक्षात हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान, एकीकडे वाढलेला उत्पादन खर्च आणि दुसरीकडे हमीभावापेक्षा कमी दर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे दुहेरी आर्थिक नुकसान होत असून त्यांच्या कर्जबाजारीपणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कापूस व सोयाबीनची हमीभावाने खरेदी सुनिश्चित करण्यासाठी तसेच खरेदी केंद्रांची संख्या वाढविणे, खरेदी प्रक्रियेत गती आणणे व खाजगी व्यापाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे व कापूस व सोयाबीनची हमीभावाने खरेदी प्रभावीपणे राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाद्वारे कापूस हंगाम २०२५-२६ करीता मध्यम धाग्याच्या कापसासाठी रुपये ७,७१०/- प्रति क्विंटल आणि लांब धाग्याच्या कापसासाठी रुपये ८,११०/- प्रति क्विंटल आणि सोयाबीन हंगाम २०२५-२६ करीता रुपये ५३२८/- प्रति क्विंटल किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यात आली आहे.

(२) कापूस व सोयाबीन खरेदी ही पूर्णपणे केंद्र शासनाने विहीत केलेल्या किमान आधारभूत किंमत गुणवत्ता मानकांनुसार केली जाते. किमान आधारभूत किंमत दर्जाच्या मानकांची पूर्तता करणारा कापूस व सोयाबीन अधिसूचित हमीदराने खरेदी केला जातो.

राज्यात दिनांक ०२/०३/२०२६ पर्यंत भारतीय कपास निगम लिमिटेड (सी.सी.आय.) ने किमान आधारभूत किंमत दराने ५,६६,८२५ शेतकऱ्यांकडून रुपये १००९७.९९ कोटी मूल्याच्या १२७.०७ लाख क्विंटल कापसाची खरेदी केली आहे.

राज्यात सोयाबीन खरेदीचा अंतिम दिनांक १२/०२/२०२६ अखेर पर्यंत एकूण २,३८,९१६ शेतकऱ्यांकडून ६.०२ लाख मेट्रीक टन सोयाबीन खरेदी करण्यात आला आहे.

(३) सी.सी.आय. ने कापूस हंगाम २०२५-२०२६ मध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या स्व-नोंदणीसाठी, सोयीसाठी आणि खरेदी प्रक्रीयेत पारदर्शकता आणण्यासाठी कपास किसान या मोबाईल ॲपद्वारे किमान आधारभूत किंमत दराने कापूस खरेदी सुरू केली आहे. या ॲपद्वारे शेतकरी त्यांच्या आधार क्रमांकाचा वापर करून स्वतःची नोंदणी करतात आणि कापसाच्या लागवडीखालील क्षेत्रासह त्यांच्या जमिनीच्या नोंदींची माहिती सादर करतात. सदरची माहिती सादर केल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत माहितीची पडताळणी करून मंजुरी दिली जाते. अशा मंजुरीनंतरच नोंदणी अंतिम केली जाते व तद्नंतर शेतकरी सी.सी.आय. ला कापूस विकू शकतात.

कपास किसान ॲपवर दिनांक ०१/०९/२०२५ पासून ते दिनांक १६/०१/२०२६ पर्यंत शेतकऱ्यांची स्व-नोंदणी करण्यात आली आहे. राज्यात एकूण ७.२० लाख शेतकऱ्यांनी कपास किसान या मोबाईल ॲपद्वारे यशस्वीरित्या स्व-नोंदणी केली असून स्लॉट बुकिंग आणि कापूस खरेदी सुरळीतपणे सुरू आहे.

नोंदणीकृत आणि पडताळणी झालेल्या शेतकऱ्यांनी किमान आधारभूत किंमत गुणवत्ता मानकांचा आणलेला कापूस सी.सी.आय. खरेदी करते.

हमीभाव मोहिमेअंतर्गत नोंदणी, बिल जनरेशन आणि शेतकऱ्यांच्या आधार लिंक बँक खात्यात पेमेंट यांसारख्या प्रत्येक टप्प्यावर रिअल-टाइम अपडेट्ससाठी एस.एम.एस. सुविधा उपलब्ध आहे. प्रिंट माध्यमे, समाजिक माध्यमे, रेडिओ (AIR/FM) वरील प्रादेशिक भाषांमधील जिंगल्स आणि पंचायत, बसस्थानक इत्यादी सार्वजनिक ठिकाणी बॅनर्स लावून हमीभाव आणि कपास किसान ॲप बद्दल व्यापक जनजागृती केली आहे.

राज्य सरकारने स्थानिक अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या स्थानिक देखरेख समित्या स्थापन केल्या आहेत, जेणेकरून समस्यांचे जागेवरच निराकरण होऊन कापूस खरेदी प्रक्रिया सुरळीत पार पडेल. याव्यतिरिक्त सी.सी.आय. ने प्रत्येक राज्यात तक्रार निवारणासाठी समर्पित हेल्पलाइन स्थापित केली आहे.

सी.सी.आय. ने कापूस हंगाम २०२५-२६ मध्ये राज्यातील जास्तीत जास्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी १६८ खरेदी केंद्रे सुरू केली आहेत. कपास किसान ॲपद्वारे शेतकरी स्लॉट बुकिंग करू शकतात ज्यामुळे प्रतीक्षा वेळ कमी होतो आणि केंद्रांवरील गर्दी टाळता येते.

अशा प्रकारे, कापूस हंगाम २०२५-२०२६ साठी कपास किसान या मोबाईल ॲपद्वारे शासकीय कापूस खरेदी केंद्रावर केंद्र निवडीपासून ते कापूस मोजणीपर्यंतच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यात आलेली आहे.

सोयाबीन हमीभाव खरेदी प्रभावीपणे राबविण्यासाठी शासन निर्णय, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ अन्वये खरेदी केंद्रांकरीता मार्गदर्शक सूचना व कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली आहे. राज्यात सोयबीन खरेदीच्या अंतिम दिनांक १२/०२/२०२६ अखेर नाफेड व राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ मर्यादित (एन.सी.सी.एफ.) यांच्यावतीने ९३४ खरेदी केंद्रांमार्फत एकूण २,३८,९१६ शेतकऱ्यांकडून ६.०२ लाख मे.टन सोयाबीन खरेदी करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परतूर (जि.जालना) तालुक्यातील बागेश्वरी साखर कारखान्याकडून स्थानिक खातेदार शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याबाबत

**(१७) * ८५२८ श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागेश्वरी साखर कारखाना प्रा. लि.,(ता.परतूर, जि.जालना) या कारखान्यात जवळच्या परिसरातील शेतकऱ्यांचा ऊस वेळेत नेण्यात येत नसून, कारखाना कार्यक्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात येत असल्याने जवळच्या खातेदारांचा ऊस खरेदी केला जात नाही किंवा स्थानिक खातेदार शेतकऱ्यांचा ऊस उशिरा घेतला जात असल्याने त्यांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी स्थानिक प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी केल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखान्यामधून मोठ्या प्रमाणावर वायु प्रदूषण होत असून या कारखान्यातून निघणाऱ्या धुरामुळे १० कि.मी. परिसरात राख पडत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असून सदर प्रकारांकडे स्थानिक प्रशासन जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कार्यक्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांना प्राधान्य देणे तसेच कारखान्यामुळे होणाऱ्या प्रदुषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असल्याने संबंधित साखर कारखान्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) ऊस वेळेत न नेण्याबाबत तक्रारी प्राप्त आहेत. मात्र बागेश्वरी साखर कारखाना प्रा.लि., (ता.परतूर, जि.जालना) सध्या श्रध्दा एनर्जी ॲण्ड इन्फ्रा प्रोडक्टस प्रा.लि. हा खाजगी कारखाना असल्याने त्यांना निश्चित कार्यक्षेत्र नाही.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०९/०२/२०२६ रोजी तक्रारदार यांच्या समवेत गट नं. १६१ वरफळ मधील शेतीची पाहाणी करण्यात आली. पाहणी अहवालानुसार पीएम-१० (धुलीकण) व पीएम-२.५ (धुलीकण) सरासरी मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते.

(३) हा कारखाना खाजगी असल्याने कारखान्याचे निश्चित कार्यक्षेत्र नाही. जिल्हा आरोग्य अधिकारी जालना यांनी सदर कारखान्यातून होणाऱ्या वायू प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका झाल्याचे आढळून आलेले नाही, असे नमूद केले आहे. मात्र पाहणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने सदर उद्योगास आवश्यक सुधारणा करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हा शासकीय कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतपेढीतील लिपिक व शिपाई पद भरतीमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(१८) * ७९८८ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा शासकीय कर्मचारी सहकारी पतपेढी या संस्थेत नियमबाह्य लिपिक व शिपाई भरती प्रक्रियेत गैरव्यवहार व अनियमितता झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.सहकार मंत्री यांच्याकडे दिनांक ३ जानेवारी, २०२६ रोजी पत्रव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पतपेढीने जिल्हा उपनिबंधकांनी दिलेल्या अटींचे उल्लंघन करणे, मागासवर्गीय अनुशेष नोंदवही न तपासणे आणि सभेच्या ठरावात विसंगती असतानाही भरती प्रक्रिया राबवून गैरव्यवहार व वैयक्तिक हितसंबंधाला वाव दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने जळगाव जिल्हा शासकीय कर्मचारी सहकारी पतपेढी या संस्थेत नियमबाह्य केलीली भरती प्रक्रिया तात्काळ रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच नियमबाहयपणे भरती करण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय, खरे आहे.

(२) व (३) सदर भरती प्रक्रीयेबाबत मा.सहकार न्यायालय, जळगांव येथे विवाद (Dispute) दाखल आहे. तसेच विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक येथे पुनर्रीक्षण अर्ज दाखल असून सुनावणी कामकाज सुरु आहे.
(४) सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## मौजे डिग्रज (ता.मिरज, जि.सांगली) येथील शेतकऱ्यांची ऊस तोडणी कामगार पुरविण्यासाठी लाखो रुपयांची फसवणूक झाल्याबाबत

**(१९)** * **८४२७ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे डिग्रज (ता.मिरज, जि.सांगली) येथे सन २०२५-२६ मध्ये एका मुकादमाने एका ऊस उत्पादक शेतकऱ्याशी ओळख करून २० ऊसतोड कामगार पुरविण्याचे आश्वासन देत जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत ऑनलाईन पध्दतीने सुमारे रुपये ९ लाख ६ हजार रक्कम आपल्या खात्यावर जमा करून घेऊन शेतकऱ्याची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुकादमाने ऊस तोडणी हंगाम सुरू झाल्यानंतरही एकही ऊसतोड कामगार प्रत्यक्षात पुरविला नाही तसेच शेतकऱ्याशी संपर्क टाळून अथवा टाळाटाळ करून शेतकऱ्याने अदा केलेली संपूर्ण रक्कम परत न करता सुमारे रुपये ९ लाख ६ हजारची आर्थिक फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशा प्रकारच्या फसवणुकीस प्रतिबंध होण्यासाठी ऊसतोड कामगार पुरविणाऱ्या मुकादमांची व ऊसतोड कामगारांच्या गोपीनाथ मुंडे ऊसतोड महामंडळाच्या अधिकृत ऑनलाईन पोर्टलवर सक्तीची नोंदणी, ओळख पडताळणी व व्यवहारांची नोंद ठेवण्याबाबत तसेच भविष्यात अशा व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत

शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व शेतकऱ्याची फसवणूक करणाऱ्या संबंधित दोषी मुकादम यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) व (२) नाही.
(३) व (४) उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २२८ प्राथमिक शाळांच्या धोकादायक इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत

**(२०) * ८४९५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सुमारे २२८ प्राथमिक शाळांच्या इमारती अतिशय नादुरुस्त, जीर्ण व धोकादायक अवस्थेत असून, या धोकादायक इमारतींमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून वर्गात बसावे लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोकादायक शाळा इमारतींच्या दुरुस्ती अथवा पुनर्बांधणीसाठी जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सुमारे ८ कोटी ८० लाख रुपयांच्या निधीची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांच्या जीर्ण व धोकादायक इमारतींच्या दुरुस्ती अथवा पुनर्बांधणीसाठी सदरहू निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

तथापि, जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत प्राथमिक शाळा ज्या नादुरूस्त अथवा धोकादायक अवस्थेत आहेत अशा ठिकाणी शाळा भरवू नये याबाबत सर्व गटशिक्षण अधिकारी, मुख्याध्यापक यांना कळविण्यात आले आहे.
(२) व (३) जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ मध्ये रत्नागिरी जिल्ह्याच्या आराखड्यात प्राथमिक शाळा दुरूस्ती कार्यक्रमाला ४५०.०० लक्ष व वर्गखोली बांधकाम करीता रक्कम रूपये ६३५.०० लक्ष मंजूर केली आहे.

जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील धोकादायक शाळांच्या नवीन वर्गखोली इमारतींच्या बांधकामाकरीता सन २०२६-२७ च्या आराखड्यामध्ये ८ कोटी ८० लक्ष रक्कमेला, तसेच २२८ शाळांच्या दुरूस्तीकरीता ९ कोटी ६२ लक्ष रक्कमेला मंजूरी घेण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नाफेड व राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ यांच्यामार्फत सोयाबीन खरेदीसाठी निश्चित करण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण झाले नसल्याबाबत

**(२१) * ८५२१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नाफेड व राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ यांच्यामार्फत चालू हंगामात सोयाबीन खरेदीसाठी निश्चित करण्यात आलेले उद्दिष्ट अद्याप पूर्ण झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तांत्रिक अडचणी, नोंदणीतील त्रुटी, केंद्रांची अपुरी संख्या अथवा मनुष्यबळाच्या अभावामुळे सोयाबीन खरेदी प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या असून खरेदी प्रक्रिया वेळेत न झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा (MSP) कमी दराने सोयाबीन विक्री करावी लागत असल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी नाफेड व एनसीसीएफकडून सोयाबीन खरेदीचा वेग वाढविणे, खरेदी केंद्रांची संख्या वाढविणे व तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या किमान आधारभूत योजनेंतर्गत हंगाम २०२५-२६ साठी केंद्र शासनाने १८,५०,७०० मे.टन खरेदी मंजूर केली आहे. त्यानुसार राज्यात सोयाबीन खरेदीसाठी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ पासून शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व दिनांक १५ नोव्हेंबर, २०२५ पासून दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत प्रत्यक्ष खरेदी सुरू करण्यात आली. राज्यात खरेदीच्या शेवटच्या दिनांकाअखेर नाफेड व एनसीसीएफ यांच्यावतीने ९३४ खरेदी केंद्रांमार्फत एकूण २,३८,९१६ शेतकऱ्यांकडून ६.०२ लाख मे.टन सोयाबीन खरेदी करण्यात आला आहे. दरम्यान जानेवारी, २०२६ या कालावधीत अनेक बाजारपेठांमध्ये सोयाबीनचा सरासरी प्रचलित बाजारभाव वाढल्याचे दिसून आले. त्यामुळे शेतकऱ्यांनी खुल्या बाजारात सोयाबीन विक्री केली.
(२) व (३) हे खरे नाही.

किमान आधारभूत योजनेंतर्गत हंगाम २०२५-२६ मधील सोयाबीन खरेदी प्रक्रीया प्रभाविपणे राबविण्यासाठी नाफेड यांनी ९१० व एनसीसीएफ यांनी १५८ अशा एकूण १०६८ खरेदी केंद्रांना मान्यता देण्यात आली. सदर खरेदी केंद्रांची संख्या मागील हंगामपेक्षा जास्त आहे.

खरेदी प्रक्रीयेत सुसूत्रता आणण्याकरीता नोडल संस्था व त्यांच्या अंतर्गत कार्यरत खरेदी केंदे यांचे शासन निर्णय दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ अन्वये कार्यप्रणाली निकष निश्चित करण्यात आले आहेत. खरेदी केंद्रावर पायाभूत सुविधा, साधन सामग्री आणि आवश्यक मनुष्यबळ पुरविण्याच्या सूचना राज्य शासनामार्फत देण्यात आल्या होत्या. तसेच, हमीभाव खरेदी प्रक्रीयेवर गैरव्यवस्थापन टाळण्याच्या दृष्टीने

शासन निर्णय दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुका स्तरीय दक्षता पथक नियुक्त करण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील मनूर-कोल्हाडी उपसा सिंचन प्रकल्पाच्या कोट्यवधी रुपयांच्या यंत्रसामग्रीची चोरी झाल्याबाबत

**(२२) * ८०१५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील मनूर-कोल्हाडी उपसा सिंचन प्रकल्पासाठी खरेदी करण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या यंत्रसामग्रीची चोरी झाल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पातील यंत्रसामग्रीची चोरी झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० जानेवारी, २०२६ रोजी मा.सचिव, जलसंपदा विभाग, मा.मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव, मा.जिल्हाधिकारी, जळगांव तसेच मा.पोलीस अधीक्षक, जळगांव यांच्याकडे लेखी निवेदन व पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी कंत्राटदार, अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) सदर विषयाबाबत मा.लोकप्रतिनिधींचे दिनांक १८/०१/२०२६ रोजीचे लेखी निवेदन क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त आहे.
(३) अधीक्षक अभियंता, जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगांव यांच्या दिनांक १३/०२/२०२६ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार तसेच NHAI आणि त्यांच्याकडील अभिकरणाने पत्राने कळविल्यानूसार सदर यंत्रसामग्रीची चोरी झाली नसून सदर सामग्री ही NHAI यांचे ताब्यात असल्याचे प्राथमिक तपासात दिसून आले आहे.

त्यानूसार मुक्ताई उपसा सिंचन योजनेच्या १६१८ हे. क्षेत्रासाठी रुपये २१.४८ कोटी एवढी रक्कम योजनेच्या पंपगृहाच्या नव्याने पुनर्स्थापनेसाठी लागणार आहे. सदरच्या मुक्ताई उपसा सिंचन योजनेच्या झालेल्या नुकसानीबाबत व योजनेचे पंपगृहाचे नव्याने पुनर्स्थापना करणेसाठी स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी घटकांसाठी लागणारी एकूण रुपये २१.४८ कोटी रक्कम NHAI यांचेमार्फत जलसंपदा विभागास भरणेसाठी दिनांक १०/०२/२०२६ रोजी कळविण्यात आले आहे. त्यानूसार पुढील आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड प्रमाणीकरणाची सक्ती रद्द करण्याबाबत

**(२३) * ८५२२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संचमान्यता तसेच विविध शासकीय लाभ (उदा. मध्यान्ह भोजन, मोफत गणवेश इत्यादी) मिळण्यासाठी आधार कार्ड प्रमाणीकरण अनिवार्य करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधार कार्डमधील तांत्रिक त्रुटी, बायोमेट्रिक जुळणी न होणे अथवा पालकांकडे आधार कार्ड उपलब्ध नसल्यामुळे हजारो विद्यार्थी शासकीय योजनांपासून वंचित राहत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आधार प्रमाणीकरणाची अट/सक्ती शिथिल करण्याबाबत किंवा रद्द करण्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाने निकाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड प्रमाणीकरणाची सक्ती रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) आरटीई कायदा, २००९ ची यशस्वी अंमलबजावणी तसेच शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणणे या दृष्टीने शालेय विद्यार्थ्यांचे आधारकार्ड देण्यासंदर्भात अभियान राबविण्याबाबत शासन निर्णय, दिनांक २१ एप्रिल २०१५ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयान्वये शाळांनी प्रवेश दिलेल्या प्रत्येक बालकाकडे आधारकार्ड तयार करण्यासाठी दिनांक २७ एप्रिल ते २६ जून हा कालावधी ठरवून दिला आहे. राज्यातील शाळांमध्ये प्रवेशित प्रत्येक बालकांचे आधार कार्ड काढून ते प्रवेश क्रमांकाशी जोडण्यात यावे, असे शासन निर्णयात स्पष्ट केले आहे. यामुळे भविष्यात एकही बालक शाळाबाह्य होणार नाही व झालेच तर ते कोणत्या ठिकाणी आहे, याचा शोध घेणे सुलभ होईल व त्यांच्या प्रगतीबाबत पालकांना माहिती घेणे शक्य होईल.

शाळेतील बालकांचे आधारकार्ड तयार करून प्रवेश क्रमांकाशी जोडण्याची कार्यप्रणाली तसेच आधारकार्ड कार्यवाही व अहवाल, सदर अभियानाचे प्रबोधन याबाबत सविस्तर तपशील या शासन निर्णयामध्ये दिला आहे. त्यानुसार याबाबतचे सर्व नियोजन मुखत्वे जिल्हाधिकारी कार्यालय, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, शिक्षक व मुख्याध्यापक यांनी करायचे आहे.

सदर शासन निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्रमांक ७३/ २०१५ दाखल करण्यात आली होती. सदर शासन निर्णयातील उद्देश एकही विद्यार्थी शाळाबाह्य राहू नये, असा असल्याने तसेच, या शासन निर्णयान्वये आधारकार्ड योजना बंधनकारक केलेली नसल्यामुळे सदर शासन निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाच्या (दिनांक २३/०९/२०१३ व दिनांक १५/१०/२०१५ रोजीच्या)

आदेशांशी विसंगत नाही, असे स्पष्ट होते, असे निरीक्षण नोंदवून, मा.उच्च न्यायालयाने सदर जनहित याचिका विचारात घेण्याची आवश्यकता नसल्याचे नमूद करून दिनांक २७/०६/२०१६ रोजीच्या आदेशाद्वारे निकाली काढली आहे.

(४) भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) यांच्यामार्फत बालकांच्या ५ व्या वर्षी व पुन्हा १५ व्या वर्षी आधार बायोमेट्रिक अद्ययावत करणे आवश्यक असल्याने देशातील सर्व शाळांना आधार अद्ययावत करणेबाबत आवाहन केले आहे. विविध पध्दतीने ऑनलाईन माहिती व स्पर्धा परीक्षा/ विद्यापीठ परीक्षांमध्ये नोंदणी करताना विद्यार्थी व त्यांच्या पालकांना अडचणी येऊ नयेत, याकरीता वेळेत बायोमेट्रिक अपडेट करणे महत्त्वाचे असल्याचे UIDAI ने स्पष्ट केले आहे.

आधार प्राधिकरण (UIDAI) यांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना मुलांचे आधार कार्ड काढण्याकरीता विशेष मोहिम राबविणेबाबत कळविले आहे. आधार अद्ययावत करणे ही प्रक्रिया शाळांमधून शिबिरांच्या माध्यमातून अधिक वेगाने पूर्ण होणे शक्य असल्याने सदर कार्यवाही मोहिम स्वरुपात राबविण्याबाबतच्या सूचना आयुक्त (शिक्षण) यांना दिनांक ०१/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

आधार नोंदणी किंवा अद्ययावत न झालेल्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही योजनेपासून वंचित ठेवण्यात येत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.